# छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि ब्राह्मणेतर वृत्तपत्र सृष्टी

**प्रकाश बाळू नाईक,** सरूड, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर.

---

**प्रस्तावना:**

एत्तद्देशीय वृत्तपत्र सृष्टीचा प्रारंभ बिंदू म्हणून बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पण कडे पाहिले जाते. ब्रिटिश कालखंडात वृत्तपत्र सुरू करणे व ते चालविणे हे भारतीयांसाठी एवढे सोपे नव्हते. कारण मूलतः शिक्षण आणि ज्ञानाची मक्तेदारी ही एका ठराविक वर्गाकडे होती आणि दुसऱ्या बाजूला ब्रिटिशांची कठोर बंधनेही होती. अशा कालखंडामध्ये बहुजनांच्या आणि सर्वसामान्यांच्या व्यथा वेदनांना वाचा फोडून वृत्तपत्र चालवण्याचे काम काही मंडळींनी केले होते. वृत्तपत्र सृष्टीचा हा प्रवाह नंतरच्या काळामध्ये अधिक विकसित होत गेला. भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर अशा दोन भागांमध्ये वृत्तपत्र सृष्टी विभागल्याची दिसून येते. ब्राह्मणेतर वृत्तपत्त सृष्टीचा विचार करता मुकुंदराव पाटील यांच्यापासून केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, प्रबोधनकार ठाकरे, बाबासाहेब आंबेडकर, श्रीपतराव शिंदे व खंडेराव बागल अशा अनेक संपादक व पत्रकारांची आपल्याला नोंद घ्यावी लागते. अशा ब्राह्मणेतर वृत्तपत्रसृष्टीला छत्रपती शाहू महाराजांनी प्रचंड मोठे आर्थिक योगदान आणि पाठबळ दिल्याचेही दाखले आपल्याला इतिहासामध्ये सापडतात. खरे पाहता छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे एक दूरदृष्टीचे आणि आधुनिक विचारांची पुरस्कर्ते असलेले राजे होते. ते इतर संस्थानिकांसारखे सत्ताविलासी नव्हते तर समग्र परिवर्तनाचा ध्यास घेतलेले राजे होते. त्यांनी आपली राजसत्ता बहुजनांच्या आणि सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी पणाला लावलेली होती. शेतकरी, दलित, आदिवासी, भटके, स्त्रिया, कामगार, कष्टकरी, वंचित या सर्व समुदायाला त्यांनी आपल्या राजसत्तेच्या माध्यमातून शक्ती देण्याचेच काम केले होते. ज्या पद्धतीने त्यांनी सर्वहारा वंचित समुदायाला ताकद दिली, त्याचप्रमाणे त्यांनी कला, क्रीडा, साहित्य, कृषी, तंत्रज्ञान अशा वेगवेगळया क्षेत्रांमधील होतकरू आणि प्रतिभासंपन्न व्यक्तींना पाठबळ देण्याचे काम केले होते. वृत्तपत्रसृष्टी आणि शाहू महाराज यांच्यातला संबंध उलगडून पाहताना आपल्याला एक गोष्ट जाणवते ती म्हणजे ब्राह्मण समुदायातील काही वृत्तपत्रांना शाहू महाराजांनी आर्थिक मदत केली होती. त्याच प्रमाणे त्यांनी ब्राह्मणेतर समुदायातील वृत्तपत्रांना आर्थिक सहकार्य करुन त्यांना प्रोत्साहन दिले. त्यांना परिवर्तनाच्या लढाईमध्ये आपल्या सोबत जोडून घेतले. वृत्तपत्रांचे महत्त्व राजर्षी शाहू महाराजांनी जाणले होते. वृत्तपत्रांच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन करता येते व समाजामध्ये परिवर्तन घडवता येते, यावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळेच अनेक संपादक व पत्रकारांना त्यांनी सातत्याने पाठबळ देण्याचे धोरण करवीर संस्थानमध्ये अवलंबिले. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ब्राह्मणेतर वृत्तपत्र सृष्टीतील संपादक व पत्रकारांना राजर्षी शाहू महाराजांनी पाठबळ देऊन परिवर्तनाच्या लढाईला कशा प्रकारे नवा आयाम दिला याचा शोध घेतला जाणार आहे.

**राजर्षी शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर वृत्तपत्रांना केलेली मदत-**

राजर्षी शाहू महाराजांनी उघडपणे ब्राह्मण्यवादी शक्तींच्या विरोधात एल्गार पुकारला होता. जी व्यवस्था बहुजन आणि सर्वसामान्य, कष्टकरी, वंचितांना शोषणाच्या गर्तेत ढकलते व त्यांचे शोषण करते, त्या व्यवस्थेला नेस्तनाबूत करणे आणि एक पर्यायी समतेवर आधारलेली व्यवस्था निर्माण करणे, हे शाहू महाराजांचे ध्येय होते. या ध्येयाला अनुसरून त्यांनी सातत्याने वाटचाल सुरू केली. त्यासाठी त्यांनी परिणामांची तमा बाळगली नाही. म्हणूनच ज्या काळामध्ये ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर असा संघर्ष तीव्र झाला होता, अशा काळामध्ये त्यांनी ब्राह्मणेतर पक्षाची बाजू उचलून धरली. प्रबोधनाच्या चळवळीमध्ये त्यांनी प्रभावी धोरणे राबविली. त्याचबरोबर शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर चळवळीतल्या अनेक पत्रकार व संपादकांना आर्थिक मदत केल्याचे व त्यांना प्रोत्साहित केल्याचे दाखले आपल्याला इतिहासामध्ये मिळतात. त्यातील काही प्रमुख संपादक व पत्रकारांच्या संदर्भाने या शोधनिबंधामध्ये मांडणी केला जाणार आहे.

विसाव्या शतकातील दुसऱ्या दशकाच्या प्रारंभापासूनच शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील सुशिक्षित ब्राह्मणेतरांना वृत्तपत्र काढण्यास प्रोत्साहित केले होते. १९११मध्ये बळवंत कृष्णा पिसाळ यांनी महाराजांच्याच प्रोत्सानाने 'विश्वबंधू' हे पत्र सुरू केले होते. १ 'तरुण मराठा' हे वृत्तपत्र सुरू करणाऱ्या दिनकरराव जवळकरांनाही महाराजांनीच आश्रय दिला होता. 'प्रणय प्रवाह' ही खळबळजनक नाट्य कलाकृती दिनकरराव जवळकरांनी जन्मास घातली आणि सरकारने त्या नाट्यकृतीचा प्रयोग होऊ दिला नाही. त्यामुळे जवळकरांचे नाव संपूर्ण महाराष्ट्रभर गाजले. अशा दिनकरराव जवळकरांना महाराजांनी पुण्याहून कोल्हापूरला आणले आणि 'तरुण मराठा' साठी सर्व प्रकारचे सहाय्य केले. 'महाराजांच्या प्रेरणेने दिनकरराव जवळकरांनी तरुण मराठा हे वृत्तपत्र सुरू केले.'२सत्यशोधक कार्यकर्ते व ब्राह्मणेतर पक्षाचे धडाडीचे नेते वालचंद कोठारी यांनी केसरीला आव्हान देणारे आपले 'जागृत' हे पत्र १९१७ ला पुण्यात सुरू केले. शाहू महाराजांनी

कोठारींच्या या प्रयत्नांचे मनःपूर्वक कौतुक केले. १९१९ मध्ये त्यांनी कोठारींकडे 'जागरूक' साठी तीन हजार रुपयांची मदत पाठवल्याचा उल्लेख सापडतो. याचाच अर्थ वालचंद कोठारी यांनी 'जागरूक'च्या माध्यमातून जे प्रबोधन करण्याचे काम हाती घेतले होते त्या कामाला महाराजांनी आर्थिक सहाय्य करून पाठिंबा दर्शविल्याचे दिसून येते. अर्थात नंतरच्या काळामध्ये सरकारच्या धोरणांवर टीका करण्याच्या मुद्द्यावरून महाराजांशी त्यांचे काही मतभेद झाल्याचे दिसते. पुण्यामध्ये १ डिसेंबर १९१९ रोजी श्रीपतराव शिंदे यांनी 'विजयी मराठा' चा पहिला अंक काढला. 'विजयी मराठा' या पत्राचे सुद्धा शाहू महाराजांनी अतिशय कौतुक केले होते. वास्तविक श्रीपतराव शिंदे यांच्यासारख्या ब्राह्मणेतर समाजातील संसारी गृहस्थाने चांगली नोकरी सोडून या वृत्तपत्राच्या फंदात पडू नये, असे महाराजांना वाटत होते. परंतु शिंदे यांनी अत्यंत जिद्दीने 'विजय मराठा' ची स्थापना केली, हे पाहून महाराजांनी त्यांना खास बोलावून घेतले. त्यांना शाबासकी दिली व त्या पत्रासही आर्थिक मदत सुरू केली.[३] बेळगाव येथून शामराव भोसले व शामराव देसाई यांनी 'राष्ट्रवीर' हे वृत्तपत्र सुरू केले होते. हे वृत्तपत्र म्हणजे एक प्रकारे सत्यशोधक आणि ब्राह्मणेतर चळवळीचे मुखपत्र होते. पश्चिम आणि दक्षिण महाराष्ट्रामध्ये त्यातून मोठी राजकीय व सामाजिक जागृती घडून येत होती. महाराजांनी या 'राष्ट्रवीर'ला आर्थिक सहाय्य केले होते. सत्यशोधक चळवळीतले दुसरे एक थोर कार्यकर्ते व प्रसारक मुकुंदराव पाटील यांच्या 'दिनमित्र'. या वृत्तपत्राच्या मागेही महाराजांनी असेच मोठे पाठबळ उभे केले. मुकुंदरावांचे जनक पिता कृष्णराव भालेकर यांच्या 'दीनबंधू' या सत्यशोतकी पत्राचा त्यांना वारसा लाभलेला होता. अशा मुकुंदरावांचे 'दीनमित्र' हे वृत्तपत्र जेव्हा आर्थिक अडचणीत होते आणि ते बंद पडते की काय अशी परिस्थिती जेव्हा निर्माण झाली, तेव्हा शाहू महाराजांनी मुकुंदरावांच्या या पत्राला भरघोस सहाय्य केले आणि या सहाय्यमुळेच 'दीनमित्र' ला जीवदान मिळाले. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. याच दरम्यान १९२० मध्ये 'मूकनायक' हे अस्पृश्य समाजाचे कैवार घेणारे पाक्षिक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केले. ही भारतीय पत्रकारितेच्या क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण घटना होती. कारण ज्या समाजाला नाकारण्यात आले आणि ज्ञानापासून वंचित ठेवण्यात आले अशा समाजातील एक व्यक्ती 'मूकनायक' नावाचे वृत्तपत्र सुरु करते याचे राजर्षी शाहू महाराजांना अपार कौतुक वाटले. वास्तविक त्यापूर्वीच महाराजांची आणि बाबासाहेब आंबेडकरांची भेट झाली होती. या पाक्षिकाचे महत्त्व जाणून राजर्षी शाहू महाराजांनी 'मूकनायक' पाक्षिकासाठी अडीच हजार रुपयांचे भरघोस अर्थसहाय्य केले होते. शाहू महाराजांकडून मिळलेले मिळालेल्या या उत्तेजनामुळेच प्रोत्साहित होऊन ३१ जानेवारी १९२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक' चा पहिला अंक प्रसिद्ध केला होता. पुढील शिक्षणासाठी बाबासाहेब आंबेडकरांना इंग्लंडला जावे लागले. त्यामुळे 'मूकनायक' ची वाटचाल फार टिकली नाही. तरीसुद्धा भारतीय वृत्तपत्र सृष्टीचा इतिहासात 'मुकनायक'चे स्थान आणि राजर्षी शाहू महाराजांनी त्याला दिलेली मदत या गोष्टी अतिशय महत्त्वाच्या आहेत. प्रबोधनकार ठाकरे यांच्या 'प्रबोधन'ला ही राजर्षी शाहू महाराजांनी सातत्याने आर्थिक मदत केली होती. प्रबोधनकार ठाकरे आणि राजर्षी शाहू महाराज यांच्यामध्ये नेहमीच संवाद होत असायचा. प्रसंगोपात प्रबोधनकार ठाकरे यांनी राजर्षी शाहू महाराजांवर आपल्या 'प्रबोधन' मधून टीका केल्याचे ही दिसून येते. याचा अर्थ आर्थिक मदत घेतली तरीसुद्धा ज्यांना ज्यांना महाराजांनी मदत केली ती वृत्तपत्रे महाराजांच्या दावणीला बांधली गेली नव्हती. ती आपले स्वतंत्र विचार व अस्तित्व टिकवून होती, हे सुद्धा आपण ध्यानात घेतले पाहिजे. परंतु प्रबोधनकार ठाकरे यांचे आणि महाराजांचे अतिशय जवळचे संबंध होते. 'प्रबोधन' साठी महाराजांनी सातत्याने आर्थिक मदत केलेली होती. "ब्राह्मणेतर पक्षाचीभूमिका, सामाजिक न्यायाची व राजकीय हक्काची बाजू समाजासमोर व सरकारी दरबारी मांडण्यासाठी ब्राह्मणेतर वृत्तपत्रांची मोठी गरज निर्माण झाली. म्हणूनच महाराजांनी बहुजन समाजातील अनेकांना वृत्तपत्र काढण्यास उद्युक्त केले. तर अनेकांना प्रत्यक्ष अर्थसाह्य करून प्रोत्साहित केले."[४] हे डॉक्टर एम.पी.पाटील यांचे मत अतिशय महत्त्वाचे आहे. तत्कालीन मातंग समाजाचे पुढारी कोंडीराम काशीराम सकट व बाबुराव धोंडीबा वायदंडे यांनी सुरू केलेले 'मातंग बंधू' हे वृत्तपत्र १९२२ ला सुरू झाले. या वृत्तपत्राला परवानगी मिळवण्यासाठी श्रीपतराव चांदणे यांनी थेट गव्हर्नरशी पत्रव्यवहार करून ती परवानगी आणण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती. यासाठी शाहू महाराजांनी चांदणे व त्यांच्या सहकार्यांना मार्गदर्शन केले होते. ५ या 'मातंग बंधू' साठी सुद्धा छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक मदत देण्याचे आश्वासन दिलेले होते, हे 'मातंग बंधू' मधील महाराजांच्या मृत्युलेखावरून समजून येते. याचाच अर्थ राजर्षी शाहू महाराजांनी मातंग समाजासारख्या एका उपेक्षित, वंचित जाती समुदायातून सुरू होत असलेल्या या वृत्तपत्रासाठी आपुलकीने आणि सहृदयतेने मदत देण्याचे ठरविलेले होते. यातूनच राजर्षी शाहू महाराजांचा ब्राह्मणेतर समाजातील वेगवेगळ्या वंचित जाती समुदायातील वृत्तपत्रांकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा उदारमतवादी व संवेदनशील होता, हे स्पष्टपणे दिसून येते.

**निष्कर्ष:**

वरील विवेचनावरून हे सिद्ध होते की, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर वृत्तपत्र सृष्टीला भरीव मदत केली होती. ब्राह्मणेतर समुदायातून विविध वृत्तपत्रे सुरू व्हावीत व त्या माध्यमातून लोकांचे प्रबोधन व्हावे व त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडावी, यासाठी त्यांनी संपादक व पत्रकारांना सातत्याने प्रोत्साहित केल्याचे दिसून येते. यासाठी त्यांनी या सर्व वृत्तपत्रांना भरीव आर्थिक मदत केल्याचेही दिसते. शाहू महाराजांनी ब्राह्मण्यवादी शक्तींना वैचारिक विरोध करत असताना बहुजन समाजातील वेगवेगळ्या बुद्धिवंत, प्रतिभावंतांना सातत्याने मदत केली. आर्थिक पाठबळ दिले व त्यांना प्रोत्साहन दिले, हे सुद्धा दिसून येते. खऱ्या अर्थाने विसाव्या शतकातील प्रबोधनाची चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी जेधे, जवळकर, प्रबोधनकार ठाकरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर,श्रीपतराव शिंदे या व यांच्यासारख्या अनेक संपादक -पत्रकारांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. या प्रबोधन चळवळीला राजर्षी शाहू महाराजांनी प्रोत्साहन देऊन त्यांच्या पाठीशी उभे राहून आणि त्यांना आर्थिक मदत करून एक प्रकारे या प्रबोधन चळवळीला गती देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे, हे सिद्ध होते.

**संदर्भ :-**

१. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, २००१ पृ. २३१.
२. एम. पी. पाटील, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती २००१ पृ. ६८१.
३. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती २००१शा. पृ.२३३.
४. एम. पी. पाटील, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती २००१ पृ. ६८४.
५. इतिहास अभ्यासक सुहास नाईक यांची मुलाखत, दि २२/१०/२०२२